## ग्वाही

एक वर्षं...
काय हे..
कसे रे करायचे ?
तू तिथे मी इथे..
फक्तं फक्तं झुरायचे?
घाटतली सफर असो
वा असो समुद्रकाठ..
बरसणारी रात असो की
रानातली वाट..
एकट्याने फिरायचे?
तू तिथे मी इथे..
फक्तं फक्तं झुरायचे?
लक्ष लक्ष स्वप्नांची,
बांधुनिया तोरणे..
तुकड्यांचे आयुष्य आपले,
कणाकणाने जोडणे...
याविना सांग तू,
काय रे करायचे?
तू तिथे मी इथे..
फक्तं फक्तं झुरायचे !
-
तरी श्वास देतो..
ग्वाही जराशी..
तव-भेटीचा ध्यास,
राही उराशी !!

**- प्रीती देशपांडे**

**www.meetipreeti.com**